शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेकरीता निर्माण करण्यात आलेल्या शिक्षकीय पदांच्या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१४/प्र.क्र.७३/१४/तांशि-५,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० जानेवारी, २०१८.

वाचा :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.मान्यता-२०१४/प्र.क्र.७३/१४/ तांशि-५, दिनांक २१ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेमध्ये सन २०१४-१५ पासून विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी असे २ नवीन पदविका अभ्यासक्रम प्रत्येकी ६० प्रवेश क्षमतेने सुरू करण्यात आलेले आहेत. त्याकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषानुसार नव्याने आवश्यक २१ शिक्षकीय पदे भरण्याबाबत उपरोक्त शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१७ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये या २१ शिक्षकीय पदांसाठीच्या वेतनावरील खर्च कोणत्या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल याबाबतचे लेखाशिर्ष नमूद करण्यात आलेले नाही.

शासन निर्णय :-

उपरोक्त शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०१७ अन्वये शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेतील निर्माण करण्यात आलेल्या २१ शिक्षकीय पदांसाठीच्या वेतनावरील खर्च **"मागणी क्र.डब्ल्यू ३ - २२०३ तंत्रशिक्षण, - १०५ तंत्रनिकेतने, (००)(०१) - शासकीय तंत्रनिकेतने (२२०३ ०२० २) ०१ वेतन"** या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली करण्यात यावा.

२. हा आदेश राज्य शासनाच्या www.maharashtgra.govt.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१३०११२१४६९१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a9657 9dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842c da576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2018.01.30 11:25:32 +05'30'

(अ. र. काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर,

३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर / मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
५. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
८. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया,
९. वित्त विभाग, व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि-३,७, मंत्रालय, मुंबई,
११. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-५.